RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष 11, अंक 17] सोमवार, जुलै 14, 2025/आषाढ 23, शके 1947 [पृष्ठे ३, किंमत : रुपये 26.00

**असाधारण क्रमांक 84**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **14 जुलै, 2025** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **116** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXXIX OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

**सन 2025 चे विधानसभा विधेयक क्रमांक 79.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

1959 चा 3. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**1.** या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, 2025, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन 1959 चा अधिनियम क्रमांक 3 याच्या कलम 176 ची सुधारणा.

**2.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) कलम 176 मध्ये,- 1959 चा 3.

(अ) पोट-कलम (5) मधील, " ( पोट -कलम (2) च्या खंड (सव्वीस) अन्वये केलेल्या नियमांव्यतिरिक्त)" हा मजकूर वगळण्यात येईल आणि तो, 15 ऑगस्ट 1975 पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(ब) पोट-कलम (6) वगळण्यात येईल आणि ते, 15 ऑगस्ट 1975 पासून वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**3.** मुख्य अधिनियमात अथवा कोणत्याही न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा मुख्य अधिनियमाच्या कलम 176 च्या पोट-कलम (6) अन्वये प्राथमिक नियम राज्य विधानमंडळासमोर न मांडता, मुख्य अधिनियमाच्या कलम 176 च्या पोट-कलम (2) च्या खंड (सव्वीस) अन्वये कोणताही नियम करण्यात आला असेल त्या बाबतीत, तो नियम, कायद्यानुसार वैधपणे करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि नेहमीच वैध असल्याचे व अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्या अन्वये केलेल्या अशा कोणत्याही नियमांना किंवा कोणत्याही अधिसूचनांना किंवा आदेशांना, मुख्य अधिनियमाच्या कलम 176 च्या पोट-कलम (6) च्या तरतुदींचे पालन करण्यात आलेले नाही केवळ या कारणावरून कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

पंचायती ह्या, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243ब अन्वये घटित करण्यात आलेल्या ग्रामीण क्षेत्रांच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (1959 चा 3) याचे कलम 124 हे, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येतील अशा, किमान व कमाल दरांस अधीन राहून आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा सुटींस अधीन राहून, कर व शुल्क बसविण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस प्रदान करते.

2. कर व शुल्क हे, ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम 124 अन्वये केलेले कर व शुल्क यासंबंधीचे प्रारूप नियम, अंतिम स्वरुपात प्रसिद्ध करण्यापूर्वी ते राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याच्या तरतुदी कलम 176 च्या पोट-कलम (6) मध्ये अंतर्भूत असल्यामुळे अशा नियमांची अंमलबजावणी लांबणीवर पडते याचा परिणाम, पंचायतींच्या कर व शुल्क यांच्या वसुलीवर आणि अंतिमतः पंचायतींच्या उत्पन्नावर होऊ शकतो. म्हणून, असे नियम केल्यानंतर, उक्त अधिनियमान्वये केलेल्या इतर नियमांप्रमाणे, ते, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येतील अशी तरतूद करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. वरील प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम 176 मध्ये, भूतलक्षी प्रभावाने, सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

3. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **जयकुमार गोरे,**
दिनांक 11 जुलै, 2025. ग्रामविकास मंत्री.

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे,**
मुंबई, सचिव -1,
दिनांक 14 जुलै, 2025. महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.